महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये.
निदेश.
पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०१७ मधील तरतूद क्र. २.११६ मधील Major Water Course व Minor Water Course संदर्भात स्पष्टीकरण.....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई४०००३२-
शासन निर्णय क्रमांक टिपीएस -१८१८/७९४/प्र.क्र.१३१/१८/नवि-१३
दिनांक:-१२/१०/२०१८

पुणे महानगरपालिकेच्या दि.०५/०१/२०१७ रोजीच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोस्ताहन नियमावली-२०१७ (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त विकास नियंत्रण नियमावली' असा करण्यात आला आहे.) मध्ये वॉटर कोर्स बाबतची तरतूद खालील प्रमाणे समाविष्ट आहे.

**2.116 :** "Water Course" means a natural channel or an artificial one formed by draining or diversion of a natural channel meant for carrying storm water and waste water;
"Major Water Course" means a water course which carried strong water discharging from a contributing area of not less than 160 Ha.;
"Minor Water Course" means a water course which is not major;

०२. तथापि राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिकांच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये तसेच मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील महानगरपालिकांकरीताच्या (बृहन्मुंबई वगळून) प्रारुप प्रसिध्द विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये Major Water Course म्हणजे like River, Water body तसेच "Minor Water Course" म्हणजे 'नाला' याप्रमाणे नमूद आहे. राज्यातील महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये एकसुत्रता राहणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. २.११६ मधील "Major Water Course व Minor Water Course" संदर्भात स्पष्टता होण्याकरिता तसेच त्या लगतच्या भूखंडात विकास अनुज्ञेय करतेवेळी पूर्वबांधीलकी विचारात घेवून उक्त विकास नियंत्रण नियमावली मधील तरतूद क्र. ६.५.२ बाबत स्पष्टता करणेसाठी पुणे महानगरपालिकेस उक्त अधिनियमाच्या कलम-१५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. २.११६ संदर्भात "Major Water Course" म्हणजे like River, Water body तसेच "Minor Water Course" म्हणजे 'नाला' याप्रमाणे गृहित धरण्यात यावे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी नाल्या लगतच्या भूंखडामध्ये बांधकाम परवानगी अनुज्ञेय करतांना जागेवरील परिस्थितीनुसार तसेच सदर भूखंडात असलेला पुर्वीचा अधिकृत विकास, तत्कालीन विकास परवानगी वेळी अनुज्ञेय केलेली सामासिक अंतरे, पुर्नविकासातील अडचणी इ. बाबी विचारात घेवून आयुक्त पुणे महानगरपालिका उक्त विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ६.५.२ नुसार नाल्यापासूनच्या किमान अंतरामध्ये सवलत देवू शकतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रा.म.पवार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32
सत्यमेव जयते

F:\Pune\Pune Dist\PMC\Notification -154\154 निदेश.Docx

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

प्रत :-
१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री, (नगर विकास), यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव, नवि-१.
४) सह सचिव, तथा संचालक,(नगर रचना), नगर विकास विभाग.
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/- सदर निदेशाची प्रत नगर रचना संचालनायलाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावी .
६) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
७) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.
८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
९) निवडनस्ती (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते